क्र.मनपा/नसवि/२/विस/ ०१ /२०१३-२०१४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०२ एप्रिल २०१३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका विशेष सभा क्रमांक - ०१ /२०१३-२०१४

महानगरपालिका विशेष सभेची नोटीस

प्रति,
मा. ++
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ड) (ह) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची विशेष सभा **शनिवार दि. ०६/०४/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली येथे आयोजित केली आहे.** सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

२.४.१३
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. महानगरपालिकेच्या सांगली भूयारी गटार योजना टप्पा क्र.२ भाग २ आणि मिरज भूयारी गटार योजना टप्पा क्र.२ योजनांच्या कामांच्या निविदांच्या आलेल्या देकार व अनुषंगिक बाबींबाबत निर्णय घेणेकामी **उपायुक्त (जलवि) यांचे दि.३०/०३/२०१३ रोजीचे विषयपत्र.**

२. सुजल निर्मल अभियान प्रस्तावित कामासाठी उर्वरित पंपींग मशिनरी कामाच्या सादर केलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दिनांक ०२/०४/२०१३ चे विषयपत्र.**

३. युआयडीएसएसएमटी सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत संजयनगर येथे १५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ,हिराबाग येथील अस्तित्वातील व नविन जलकुंभावरील भागासाठी वितरण व्यवस्था इत्यादी कामाच्या निविदा दरास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दिनांक ०२/०४/२०१३ चे विषयपत्र.**

४. युआयडीएसएसएमटी सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत माळबंगला जलशुद्धीकरण केंद्र येथे २५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ,वसंत कॉलनी,काळी खण, इएसआर झोन येथे वितरण व्यवस्था व कंपौंड वॉल बांधणे कामाच्या निविदा दरास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दिनांक ०२/०४/२०१३ चे विषयपत्र.**

५. युआयडीएसएसएमटी सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी येथे १५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ,संजयनगर,माळबंगला,आरटीओ,उंच टाकी परिसर वितरण व्यवस्था इत्यादी कामांच्या निविदा दरास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दिनांक ०२/०४/२०१३ चे विषयपत्र.**

६. युआयडीएसएसएमटी सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत सांगलीवाडी येथे १५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ,शामराव नगर येथे वितरण व्यवस्था व कंपौंड वॉल बांधणे या कामांच्या निविदा दरास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दिनांक ०२/०४/२०१३ चे विषयपत्र.**

७. युआयडीएसएसएमटी सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत कोल्हापूर रोड येथे १५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ,कोल्हापूर रोड येथे वितरण व्यवस्था व कंपौंड वॉल बांधणे या कामांच्या निविदा दरास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दिनांक ०२/०४/२०१३ चे विषयपत्र.**

८. युआयडीएसएसएमटी सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड पाणी पुरवठा योजना माळबंगला येथील ३६.०० द.ल.ली क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता वाढविणे कामांच्या निविदा दरास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दिनांक ०२/०४/२०१३ चे विषयपत्र.**

... २ ...

९. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ खालील खरेदी सूचना श्री.उदय बाळकृष्ण देशपांडे व इतर यांनी सांगली येथील स.नं.२६६ पैकी याचा विस्तारीत सि.स.नं.११०७ या मिळकतीवरील सांगली शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्र.१२६ धर्म शाळा व स्टॉप क्वॉटर्स या वापरासाठी आरक्षीत असलेली जमिन संपादनाची नोटीस बजावली आहे. याकामी भूसंपादन प्रस्तावासाठी एकूण र.रु.१,७६,१४,६०३/- इतका खर्च आवश्यक आहे. याकामी भूसंपादन प्रस्तावापोटी २/३ रक्कम रु.७४,७९,६६१/- इतकी रक्कम मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भरणेस व खर्चास मान्यता देणेबाबत **सहा.संचालक नगररचना विभाग यांचे दि.०२/०३/२०१३ चे विषयपत्र.**

१०. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ खालील खरेदी सूचना श्रीमती उषा प्रभाकर सहस्त्रबुद्धे व इतर आठ यांनी सांगली येथील स.नं.३३१/अ/२/१ या मिळकतीवरील सांगली शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्र.१०१ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान आरक्षण क्र.१०३ दवाखाना या वापरासाठी आरक्षीत असलेली जमिन संपादनाची नोटीस बजावली आहे. याकामी भूसंपादन प्रस्तावासाठी एकूण र.रु.३,४९,८३,७६१/- इतका खर्च आवश्यक आहे. याकामी भूसंपादन प्रस्तावापोटी २/३ रक्कम रु.१,४८,५५,१००/- इतकी रक्कम मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भरणेस व खर्चास मान्यता देणेबाबत **सहा.संचालक नगररचना विभाग यांचे दि.०२/०३/२०१३ चे विषयपत्र.**

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

२-४-१३

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- ०२

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०२/०४/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सुजल निर्मल अभियानांतर्गत अस्तित्ववातील पाणी पुरवठा योजनेचे बळकटीकरणासाठी सांगली व मिरज जलशुध्दीकरण केंद्र व माळबंगला जलशुंध्दीकरण केंद्र येथील नवीन संप मध्ये हिराबाग कडील उंच टाकी भरणेकरीता पंपिंग मशिनरी व त्याला लागणारे इलेक्ट्रिकल उपांगे बदलणे इत्यादी अनुषंगिक कामे करणेचे योजनेस माहे नोव्हेंबर २०१० मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	मंजुर आकृतिबंध
१	योजनेची मंजुर किंमत	रु. २९.८५ कोटी
२	राज्यशासनाचा हिस्सा ७०%	रु. २०.८९ कोटी
३	कर्ज स्वरुपात २०%	रु.५.९७ कोटी
४	मनपा हिस्सा १०%	रु. २.९८५ कोटी
	एकुण	रु.२९.८५ कोटी

वरीलप्रमाणे मंजुर झालेल्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उशिराने अनुदान प्राप्त झाल्याने योजना पूर्ण करणेसाठी अपेक्षित खर्चामध्ये वाढ होणार हे लक्षात आलेनंतर महानगरपालिकेने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राधान्यक्रम ठरविणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती वर्ष निमित्त सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे प्रस्तावित करणेसाठी तांत्रिक सल्लागार नेमून दोन्ही योजनेंचा इंटिग्रेटेड स्टडी करुन याबाबत युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजुर असलेल्या कामांचे व सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे पुनर्घटन करुन सादर करण्यात आलेल्या योजनेच्या सुधारीत प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे.

सुधारीत युआयडीएसएसएमटी अंतर्गत नव्याने सुचविलेले कामे वगळता इतर सर्व काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सदर निविदेमध्ये खालील नवीन कामाचा समावेश आहे.

१) अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेचे बळकटीकरणासाठी सांगली व मिरज जलशुध्दीकरण केंद्र व माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथील नवीन संप मध्ये हिराबाग कडील उंच टाकी भरणेकरीता पंपिंग मशिनरी व त्याला लागणारे इलेक्ट्रिकल उपांगे बदलणे इत्यादी अनुषंगिक कामे करणे.

वरील कामाची ई-निविदा नोटीस क्र. १२/६ सन २०१२-१३ नुसार निविदा मागविणेत आले होते. सदर ई - निविदा दिनांक २६/०३/ २०१३ रोजी उघडणेत आले असून, मे. लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग सर्व्हीसेस् प्रा.लि.कोल्हापूर यांचा देकार सर्वात कमीचा म्हणजेच निविदा दरावर १४.९५% जादा होता, सदर निविदा ही सन २००९-१० च्या मजीप्रा (यांत्रिकी) व सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) व बाजारभावावर आधारीत आहे.

... २ ...

मा.महासभेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१२-१३ सालच्या दरसूची महानगरपालिकेकडील कामांसाठी लागू करणेबाबत ठराव पारित केलेले आहेत. ठेकेदाराचा देकार वरीलप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालु (सन २०१२-१३) दरसूचीनुसार तुलना करता, २.३१% जादाचे आहेत. निविदेला भाववाढीचे कलम नाही तसेच डिफेक्ट लायबिलिटी पिरियड दोन वर्षाचा आहे. या मुद्दयांचा विचार करता, सदर दर योग्य वाटतात.

तरी सदरची कामगिरी लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग सर्व्हीसेस् प्रा.लि.कोल्हापूर यांचेकडून शे.१४.९५% जादा दराने करुन घेणेस व मुळ मंजुर योजना सन २००९-१० सालच्या दरावर आधारीत असल्याने, प्रस्तावित कामाची मंजुर किंमत रु.३,३०,३८,५०२/- आहे. ठेकेदाराच्या देकारानुसार होणारी किंमत रु.४,०४,५८,३५८/- इतकी आहे.मंजुर किंमत व ठेकेदाराचा देकार यातील फरकामुळे रु.७४,१९,८५६/- लक्ष जादा खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनाकडून ही योजना पूर्ण करण्यासाठी सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार होणारी किंमत व मंजूर योजनेची किंमत यातील फरक ७०% अनुदान स्वरुपात मिळणार आहे व ३०% हिस्सा महानगरपालिकेस स्वनिधीतून उभारावा लागणार आहे. योजना सुधारीत करुन अनुदान प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. तरी सदर उपांगावर शासन अनुदानापेक्षा वरीलप्रमाणे होणा-या जादा खर्चास व सदरच्या ठेकेदाराचे सन २०१२- १३ च्या दरसूचीनुसार होणाऱ्या किंतीच्या २.३१% जादा निविदा दरास म्हणजे रु.४,०४,५८,३५८/- इतक्या रक्कमेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Salim A Sa

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

का.१८(पा.पु.)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- ०१

विषय क्रमांक :- ०१

सोबतचे उपायुक्त (जलवि.) यांचे दि.३०/०३/२०१३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

विषयांकित योजनांच्या कामांसाठी दिनांक २१ एप्रिल २०१२ दै. सकाळ व इंडियन एक्सप्रेस या राज्यस्तरीय वृत्तपत्रांमध्ये जाहिर ई-निविदा प्रसिध्द केलेल्या होत्या. या निविदांच्या देकाराबाबत निर्णय घेणे कामी विभागाने कार्यालयीन टिप्पणी दि.१५/०२/२०१३ रोजी सादर केली होती, त्या अनुषंगाने मा.आयुक्तसाो यांच्या सूचनेप्रमाणे ठेकेदारास दि.१२/०३/२०१३ रोजी अंतिम वाटाघाटीस हजर राहणेसाठी सूचित केले होते. दि.१२/३/२०१३ रोजी मा.आयुक्तसाो यांचे दालनात उपायुक्त, सांगली, मुख्य लेखापरिक्षक, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण, पी.एम.सी. या नात्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकारणचे अधिकारी व एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर चे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत बैठक पार पडलेली आहे. या बैठकीत ठेकेदारास त्याचा अंतिम दर लिखित स्वरुपात देणेबाबत सुचना केलेल्या होत्या. या अनुषंगाने ठेकेदाराने त्याचा अंतिम देकार सादर केलेला आहे. अंतिम देकारच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे निविदेची घटनानिहाय स्थिती खालीलप्रमाणे आहे.

सांगली व मिरज भूयारी गटार योजनेच्या प्राप्त निविदांची किमान देकार मुळ निविदा किंमतीवरती अनुक्रमे ८१% व ८१.०६% जादा असा होता. कामांच्या निविदा या सन २०१०-११ च्या दरसूचीवर आधारीत होत्या. निविदा दि.२१/०८/२०१२ रोजी उघडण्यात आल्या होत्या. त्यावेळेस सन २०११-१२ ची दरसूची लागू होती. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सदर निविदेचे मुल्यांकन करुन घेणेत आले होते. निविदा दर जास्त असल्याने मा.आयुक्तसाो यांच्या स्तरावर निविदा समिती समोर वाटाघाटी झाल्या. त्यात ठेकेदाराने त्यांचा दर निविदा दर सांगलीसाठी ८१% वरुन ६१.७१% पर्यंत कमी केला आहे तसेच मिरजसाठी ८१.०६% वरुन ६१.७१% पर्यंत कमी केला होता. सदर दर तत्कालिन दरसुचीनुसार (सन २०११-१२) जास्त असल्याने ठेकेदारास फेर वाटाघाटीसाठी कळविले होते. परंतु त्याच काळात सन २०१२-१३ ची दरसूची प्रसिध्द होणेच्या मार्गावर असलेने ठेकेदाराने नवीन दरसूचीनुसार मुल्यांकन करुन घेणेविषयी विनंती केली होती. मा.आयुक्तसाो यांनी सूचित केलेनुसार सन २०१२-१३ च्या दरसूची नुसार मजीप्राकडून दोन्ही निविदांचे फेर मुल्यांकन करुन घेणेत आले.

दिनांक ०६/०३/२०१३ रोजी आदेशीत केलेनुसार सर्वात कमी दर असलेले ठेकेदार एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ठाणे यांना वाटाघाटीसाठी दिनांक १२/०३/२०१३ रोजी बोलविणेत आले होते. वाटाघाटी चर्चेमध्ये त्यांनी कंपनीचे प्रतिनिधी यांनी काही मुद्दे उपस्थित केले. कंपनीने कॉम्पोझिट वॅट, सर्व्हीस टॅक्स, काम करताना युटिलिटीज् ची दुरुस्ती, शुगर केन एरिया असल्याने कामगारांची कमतरता व सिवेज वर्क करताना येणा-य ब-याच अडचणीविषयी ठेकेदाराने चर्चेत सांगितले.

... २ ...

दिनांक १२/०३/२०१३ रोजी झालेल्या वाटाघाटीच्या बैठकीत अनुषंगाने ठेकेदाराने त्यांचे दि.१२/०३/२०१३ व दि.१४/०३/२०१३ च्या पत्राने आपले लेखी म्हणणे महानगरपालिकेस दि.२१/०३/२०१३ रोजी सादर केले आहे. वरील अडचणींचा उल्लेख करुन ठेकेदाराने दोन्हीही निविदांना चालु दरसूचीच्या (सन २०१२-१३) ९.७२% जादा दराने काम करणेस लेखी सहमती दिली आहे.

ठेकेदाराचा प्राप्त देकार पाहता, सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ) सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.२ भाग २

१	निविदेची किंमत (सन २०१०-११ दरसुचीनुसार)	रू.६४,७१,५४,६७५/-
२	न्यूनतम ठेकेदाराचा देकार (एस.एम.सी. इन्फ्रा. प्रा.लि. ठाणे)	रू.११७,१३,४९,९६२/- (८१% जादा)
३	सन २०११-१२ नुसार मजीप्राने केलेली मुल्याकिंत किंमत	रू.८२,८६,६२,४८५/- (२८.०४% जादा)
४	प्रथम वाटाघाटीनंतर ठेकेदाराचा देकार	रू.१०४,६५,१३,८२५/- (६१.७१% जादा)
५	सन २०१२-१३ नुसार मजीप्राने केलेली मुल्याकिंत किंमत	रू.८८,३६,९७,१२५/- (३६.५६% जादा)
६	सन २०१२-१३ च्या मुल्याकिंत किमतीशी तुलना करता ठेकेदाराचा देकार	१८.४२% जादा
७	दि.१२/३/२०१३ च्या वाटाघाटीनंतर चा ठेकेदाराचा अंतिम देकार	रु.९६,९५,९२,४८५/- (सन २०१२-१३ मुल्यांकित किंमतीच्या ९.७२% जादा.)
८	निविदा किंमतीच्या तुलनेत ठेकेदाराचा अंतिम देकार	४९.८२% जादा

ब) मिरज भुयारी गटार योजना टप्पा क्र.२

१	निविदेची किंमत (सन २०१०-११ दरसुचीनुसार)	रू.५०,४५,६०,०५८/-
२	न्यूनतम ठेकेदाराचा देकार	रू.९१,३५,५६,४४१/- (८१.०६% जादा)
३	सन २०११-१२ नुसार मजीप्राने केलेली मुल्याकिंत किमत	रू.६६,०४,९५,०००/- (३०.९१% जादा)
४	वाटाघाटीनंतर ठेकेदाराचा देकार	रू.८१,५९,२४,०६९/- (६१.७१% जादा)
५	सन २०१२-१३ नुसार मजीप्राने केलेली मुल्याकिंत किंमत	रू.७०,६७,४१,१७७/- (४०.०७% जादा)
६	सन २०१२-१३ च्या मुल्याकिंत किमतीशी तुलना करता ठेकेदाराचा देकार	१५.४५% जादा
७	दि.१२/३/२०१३ च्या वाटाघाटीनंतर चा ठेकेदाराचा अंतिम देकार	रु.७७,५४,३६,४२०/- (सन २०१२-१३ मुल्यांकित किंमतीच्या ९.७२% जादा.)
८	निविदा किंमतीच्या तुलनेत ठेकेदाराचा अंतिम देकार	५३.६८% जादा

दोन्ही योजनेतील प्रसिध्द केलेल्या निविदेतील कामांची एकत्रित किंमत मंजुर योजनेप्रमाणे रु.११५.१६ कोटी एवढी होती. सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार दोन्ही योजनांची मजीप्राकडून केलेली मुल्यांकित किंमत रु.१५९.०४ कोटी एवढी आहे. सुधारीत योजना सादर केलेनंतर या किंमतीला मंजुरी मिळू शकेल. योजनेच्या आकृतिबंधाप्रमाणे रु.७९.५२ कोटी (५०%) शासनाकडून अनुदानाच्या स्वरुपात प्राप्त होवू शकतील. तसेच उर्वरीत ७९.५२ कोटी (५०%) महानगरपालिकेस स्वनिधीतून अथवा कर्ज स्वरुपात उपलब्ध करुन दयावे लागतील. ठेकेदाराचा अंतिम देकार एकत्रित रु.१७४.५० कोटी इतका आहे. सुधारीत योजनेच्या किंमतीपेक्षा जास्तीचा खर्च महानगरपालिकेस सोसावा लागणार आहे. प्राप्त निविदेचा अंतिम देकाराचा विचार करता जास्त दराची निविदा स्विकारावयाची झालेस रु.१५.४६ कोटी एवढा व संभाव्य भाववाढ इतका अतिरिक्त खर्च महानगरपालिकेस उचलावा लागेल. कर्जाची रक्कम व जास्तीचा खर्च गृहीत धरुन महानगरपालिकेस जवळपास रु.१०० कोटी इतके दायित्व उचलावे लागणार आहे.

प्रशासकीय स्तरावर मा.आयुक्त यांनी वेळोवेळी ठेकेदाराशी वाटाघाटीने जवळपास ३०% दर कमी केलेले आहेत. तरी सुध्दा ठेकेदाराचा दर हा चालु दरसूचीवर ९.७२% जादा आहे. ठेकेदाराच्या अंतिम देकारानुसार येणा-या वाढीव खर्चासाठी (१५.४६ कोटी) व दरसूचीतील फरक रु.४३.८७ कोटी असा एकुण ५९.३३ कोटी मंजुर रकमेपेक्षा जादा खर्च अपेक्षित आहे. दरसूचीतील फरक रक्कम रु.४३.८७ कोटी साठी योजना सुधारीत करुन शासनास सादर करुन मान्यता घ्यावी लागणार आहे. तसेच जादा देकारासाठीचे रु.१५.४६ कोटी महानगरपालिकेस स्वनिधीतून खर्च करावे लागणार आहेत. दरसूचीतील फरक व मुळ मंजुर किंमत याचे एकत्रित रकमेच्या ५०% म्हणजेच रु. ७९.५२ कोटी महानगरपालिकेस उभारणी करावी लागणार आहेत. दोन्ही योजनांसाठी सुधारीत योजनेच्या ५०% महानगरपालिका हिस्सा व ठेकेदाराचा चालु दरसुचीवरील जादाचा देकार रु.१५.४६ कोटी असा एकत्रित रु.९४.९८ कोटी तसेच संभाव्य भावाढीचा विचार करता, अंदाजे रु.१०० कोटी पर्यंत वित्तीय भार महानगरपालिकेस कर्ज अथवा स्वनिधीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दयावा लागेल. तसेच पाणी पुरवठयाच्या युआयडीएसएसएमटी व सुजल निर्मल महाअभियानांतर्गत प्रगतीपथावरील योजनांसाठी महानगरपालिकेने रु.२५ कोटी कर्ज अथवा स्वनिधीतून उपलब्ध करुन दयायचे आहेत. पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांच्या कामांसाठी एकत्रित अंदाजे रु.१२५ कोटी एवढे कर्ज आगामी वर्षात उभारावे लागणार आहे.

शासन निर्णय क्र. -एनयुआर-२००८/प्र.क्र. २०१३ नवि ३३/मंत्रालय मुंबई दि.२० फेब्रुवारी २०१० अन्वये सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. या निर्णयांतर्गत लाभार्थी स्थानिक स्वराज्य संस्थेने सुधारणांचा अंगीकार करणे हे बंधनकारक केलेले आहे. महासभेने ठराव क्र. २२२ दि.२०/०३/२०१० नुसार या अटी यापुर्वीच मान्य केलेल्या आहेत. योजनेस मान्यता देणेपूर्वी महाराष्ट्र शासनाशी सामंजस्य करार करणे आवश्यक होते,त्याप्रमाणे महानगरपालिकेने सदर सामंजस्य करार महाराष्ट्र शासनाशी केलेला आहे. सदर सामंजस्य करारामध्ये मान्य केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी करणेसाठी कालमर्यादा निश्चित करुन घेतलेली आहे.

दि.२३ जानेवारी २०१३ रोजीच्या मा. महासभेत सन्मा.सदस्य श्री. हणमंत पवार यांनी १(ज) अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा.महासभेने ठराव क्र.३५०/ दि.२३/०१/२०१३ नुसार सन २०१२-१३ ची मजीप्रा दरसूची प्रसिध्द झाल्यानंतर आलेल्या निविदा मान्यतेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने लवकरात लवकर सादर करावे असे आदेशित केले होते. मजीप्राच्या सन २०१२-१३ ची दरसुची लागू करणेस मा. महासभा ठराव क्र. ३६८/ दि.२० फेब्रुवारी २०१३ नुसार मान्यता मिळाली आहे. महासभेत वारंवार सन्मा.सदस्य यांचेकडून या विषयाचे विषयपत्र सादर करणेस विलंब होत असलेबद्दल विचारणा होत होती.

निविदाबाबत निर्णय घेणेसाठी दि.२७/०३/२०१३ पर्यंत विषयपत्र सादर करणेविषयी मा.महासभेने सूचित केले होते, परंतु शासकीय सुट्टया व निवडणूक कामांमुळे सदर विषय नगरसचिव कार्यालयात सादर करता आला नाही.

मा.महासभेने सदर विषय शहराच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने पुढील निर्णयासाठी तातडीने सादर करणेचे आदेश दिलेले आहेत. प्रशासकीय स्तरावर मा.आयुक्त यांनी वेळोवेळी वाटाघाटीने जवळपास ३०% दर कमी केलेले आहेत. चालु दरसुचीवर सदर दर ९.७२% जादा आहेत. तातडीने विषयपत्र सादर करणेची आग्रही मागणी विचारात घेता, वेळेअभावी सदर दर वाटाघाटीने यापेक्षा कमी करणे शक्य झाले नाही. दोन्ही योजनांच्या निविदांना चालु दरसूचीनुसार ९.७२% जादा दराने मान्यता दयावयाची झाल्यास, वरील सर्व बाबींचा विचार करता मा.महासभेकडे सादर होणेस मा.आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, जलनि:स्सारण, घरपट्टी व मालमत्ता इत्यादी विभागांचे सेवांचे दर / सेवा शुल्क इत्यादीमध्ये सुमारे १५% ते २०% वाढ चालु आर्थिक वर्षापासुन करणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र.शासन निर्णय क्र.संकिर्ण -२००९/प्र.क्र.२०७/०९/नवि २०/मंत्रालय मुंबई दि.०२ ऑगस्ट २०१० व महाराष्ट्र शासनाशी केलेल्या सामंजस्य कराराप्रमाणे नविन सुधारणा अंगीकारणे व त्याअनुषंगाने कर आकारणी करणे इतर प्रशासकीय व आर्थिक सुधारणा करणेच्या सहमतीच्या अधीन राहून खालील तपशिलनुसार प्रशासनाने सादर केलेल्या विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

१) सांगली भूयारी गटार योजना टप्पा क्र.२ भाग २ च्या निविदा दरास निविदा किंमतीच्या ४९.८२% जादा दराने तसेच चालु दरसूचीनुसार (सन २०१२-१३) ९.७२% जादा दरास ही सभा मान्यता देत आहे.
२) मिरज भूयारी गटार योजना टप्पा क्र.२ च्या निविदा दरास निविदा किंमतीच्या ५३.६८% जादा दराने तसेच चालु दरसूचीनुसार (सन २०१२-१३) ९.७२% जादा दरास ही सभा मान्यता देत आहे.
३) दरसूचीतील फरक मिळणेसाठी सुधारीत योजना शासनास सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.
४) अंदाजे रु. १२५ कोटी कर्ज उभारणीस ही सभा मान्यता देत आहे.

५) चालु व्याजदर व १० वर्षे कर्ज परतफेड कालावधी धरता साधारण दरवर्षी रु. २० कोटीची अतिरिक्त तरतुद कर्ज फेडीसाठी अर्थसंकल्पात करणे व सिंकिंग फंडामध्ये सदर रक्कम वर्ग करुन कर्ज फेड नियमित स्वरुपात करणे, यासाठी ही सभा मान्यता देत आहे.

६) महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, जलनि:सारण,घरपट्टी व मालमत्ता इत्यादी विभागांचे सेवांचे दर / सेवा शुल्क इत्यादींची आकारणी महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. शासन निर्णय क्र. संकिर्ण -२००९ /प्र.क्र. २०७/०९/ नवि २०/ मंत्रालय मुंबई दिनांक २ ऑगस्ट २०१० व महाराष्ट्र शासनाशी दिनांक ०२/०८/२०१० रोजी केलेल्या सामंजस्य कराराप्रमाणे सुधारीत कर आकारणी व इतर प्रशासकीय व आर्थिक सुधारणा करणे, विषयाची प्रक्रिया चालू आर्थिक वर्षापासुन सुरु करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Salim A Sarvi

ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

का.अ (पा.पु)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- ०३

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०२/०४/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेतले.

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी कर्यक्रमांतर्गत वाढीव व सुधारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेस माहे सप्टेंबर २००६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	मंजुर आकृतिबंध
१	केंद्रशासनचा हिस्सा ८०%	रु. ६३.२२ कोटी
२	राज्यशासनाचा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
३	मनपा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
	एकुण	रु. ७९.०२ कोटी

वरीलप्रमाणे मंजुर झालेल्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उशिराने अनुदान प्राप्त झाल्याने योजनापूर्ण करणेसाठी अपेक्षित खर्चामध्ये वाढ होणार हे लक्षात आलेनंतर महानगरपालिकेने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राधन्यक्रम ठरविणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती वर्ष निमित्त सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे प्रस्तावित करणेसाठी तांत्रिक सल्लागार नेमून दोन्ही योजनेंचा इंटिग्रेटेड स्टडी केला. युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजुर असलेल्या कामांचे व सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे पुनर्घटन करुन सादर करण्यात आलेल्या योजनेच्या सुधारीत प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे.

सुधारीत युआयडीएसएसएमटी अंतर्गत नव्याने सुचविलेली कामे वगळता इतर सर्व कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सदर निविदेमध्ये खालील नवीन कामाचा समावेश आहे.

१) सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेअंतर्गत संजयनगर येथे १५ लक्ष लि. क्षमतेचा जलकुंभ, हिराबाग येथील अस्तित्वातील व नवीन जलकुंभावरील भागासाठी वितरण व्यवस्था टाकणे.

वरील कामाची ई-निविदा नोटीस क्र. १२/४ सन २०१२-१३ नुसार निविदा मागविणेत आले होते. सदर ई-निविदा दिनांक २०/०२/२०१३ रोजी उघडणेत आले असून, लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग सर्व्हीसेस् प्रा.लि.कोल्हापूर यांचा देकार सर्वात कमीचा म्हणजेच निविदा दरावर १४.९५% जादा होता, सदर निविदा ह्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०११-१२ च्या दरसुचीवर आधारीत आहेत. मा.महासभेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१२-१३ सालच्या दरसूची महानगरपालिकेकडील कामांसाठी लागू करणेबाबत ठराव पारित केलेले आहेत. ठकेदाराचा देकार वरीलप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालु (सन २०१२-१३) दूरसूचीनुसार तुलना करता, १०.३७% जादाचे होते.

... २ ...

प्राप्त दर जादाचे असल्याने मा.आयुक्तसाो यांचे सूचनेनुसार दि.२१/०३/२०१३ रोजी वाटाघाटीने दर कमी करणेबाबत बैठक बोलावली होती. सदर बैठकीस मा. आयुक्त, उपायुक्त, मुख्य लेखापरिक्षक, कार्यकारी अभियंता व ठेकेदाराचे प्रतिनिधी हजर होते.

त्यावेळी ठेकेदारानी बाजारात सर्वच दर वाढले असल्याने देवू केलेले दर योग्य आहेत असे मत व्यक्त केले होते. तसेच त्यांनंतर दि.२२/०३/२०१३ रोजी पत्र देवून त्यात जादा दराची कारणे नमूद केली आहेत, ती खालीलप्रमाणे आहेत.

१) निविदेत दर २०११-१२ च्या दरसुचीवर आहेत. चालु सन २०१२-१३ च्या दरानुसार दरामध्ये वाढ झालेली आहे
२) निविदेनुसार वितरण व्यवस्थेची कामे करतेवेळी होणारे मोडतोडचे दुरुस्ती ठेकेदारांना करावी लागेल. त्याचा खर्च ठेकेदारांना करावा लागेल.
३) वाळू लिलाव अभावी उपलब्ध होत नसल्यामुळे वाळूचे दर वाढले आहेत.
४) डिझेलचे दर वाढत आहेत.
५) राफ्ट फाऊंडेशनसाठी एकुण किंमतीवर ७.५% ने किंमत वाढविलेली आहे. प्रत्यक्षात सदर खर्च २० % आहे.
६) भाववाढ क्लॉज नाही परंतु बाजारात भाववाढ होत आहे.

ठेकेदाराने पूर्वीचा देकार १४.९५% वरुन १४.५२% केला आहे. म्हणजेच त्यांनी आपले दर ०.४३% ने कमी केले आहेत. कमी केलेल्या दराची चालू दरसूचीशी तुलना करता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	रक्कम
१	निविदा किंमत (सन २०११-१२ च्या दरसूचीनुसार)	रु. ७,९३,८८,३३४/-
२	वाटाघाटीनंतरचा ठेकेदाराचे दर व किंमत	१४.५२% जादा रु. ९,०९,१५,५२०/-
३	सन २०१२-१३ चे दरसूचीनुसार किंमत	रु.८,२६,८०,२०७/-
४	सन २०१२-१३ चे दरसूचीनुसार ठेकेदाराचे सुधारीत देकार	रु.(९०९१५५२०-८२६८०२०७)/८२६८०२०७x१००=९.९६% जादा

या योजनेचे मिशन पिरियड मार्च २०१४ पर्यंत असून यामध्ये उपलब्ध अनुदान खर्च होणे अतिआवश्यक आहे. या कामाचे फेर टेंडर काढलेस, कालावधीदेखील जास्त लागू शकतो शिवाय दरवाढीमुळे फेरनिविदेमध्ये दर जास्तीचे येण्याची शक्यता प्राप्त परिस्थितीमध्ये अधिक वाटते.

ठेकेदाराचा देकार वरीलप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालु (सन २०१२-१३) दरसूचीनुसार तुलना करता, ९.९६% जादाचे आहेत.

तरी सदरची कामगिरी लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग सर्व्हीसेस् प्रा.लि.कोल्हापूर यांचेकडून शे.१४.५२% जादा दराने करुन घेणेस व मुळ मंजुर योजना सन २००५-०६ सालच्या दरावर आधारीत असून प्रस्तावित कामाची मंजुर किंमत रु.४४४.६५ लक्ष आहे. ठेकेदाराच्या देकारानुसार होणारी किंमत रु.९०९.१५ लक्ष इतकी आहे. मंजुर किंमत व ठेकेदाराचा देकार यातील फरकामुळे रु.४६४.५० लक्ष जादा खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनाकडून ही योजना पूर्ण करण्यासाठी सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार होणारी किंमत व मंजुर योजनेची किंमत यातील ५०% फरक अनुदान स्वरुपात व ५०% सॉफ्ट लोन स्वरुपात मिळणार आहे. योजना सुधारीत करुन अनुदान प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे. तरी सदर उपांगावर शासन अनुदानापेक्षा वरीलप्रमाणे होणा-या जादा खर्चास, ५०% सॉफ्टलोन घेणेसाठी व सदरच्या ठेकेदाराचे सन २०१२-१३ च्या दूरसूचीनुसार होणाऱ्या किंमतीच्या ९.३६% जादा निविदा दरास म्हणजे रु.९,०९,१५,५२०/- इतक्या रक्कमेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

वर्ग-३ (पापू)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- ०४

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०२/०४/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेतले.

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी कार्यक्रमांतर्गत वाढीव व सुधारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेस माहे सप्टेंबर २००६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	मंजुर आकृतिबंध
१	केंद्रशासनचा हिस्सा ८०%	रु. ६३.२२ कोटी
२	राज्यशासनाचा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
३	मनपा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
	एकुण	रु. ७९.०२ कोटी

वरीलप्रमाणे मंजुर झालेल्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उशिराने अनुदान प्राप्त झाल्याने योजनापूर्ण करणेसाठी अपेक्षित खर्चामध्ये वाढ होणार हे लक्षात आलेनंतर महानगरपालिकेने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राधान्यक्रम ठरविणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती वर्ष निमित्त सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे प्रस्तावित करणेसाठी तांत्रिक सल्लागार नेमून दोन्ही योजनेंचा इंटिग्रेटेड स्टडी केला. युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजुर असलेल्या कामांचे व सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे पुनर्घटन करुन सादर करण्यात आलेल्या योजनेच्या सुधारीत प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे.

सुधारीत युआयडीएसएसएमटी अंतर्गत नव्याने सुचविलेली कामे वगळता इतर सर्व कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सदर निविदेमध्ये खालील नवीन कामाचा समावेश आहे.

१) सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथे २५ लक्ष लि. क्षमतेचा जलकुंभ, वसंत कॉलनी, काळीखण ईएसआर झोन येथे वितरण व्यवस्था व कंम्पाऊंड वॉल बाधणे.

वरील कामाची ई-निविदा नोटीस क्र. १२/३ सन २०१२-१३ नुसार निविदा मागविणेत आले होते. सदर ई-निविदा दिनांक २०/०२/२०१३ रोजी उघडणेत आले असून, ए.ई.इन्फ्राप्रोजेक्ट, ठाणे यांचा देकार सर्वात कमीचा म्हणजेच निविदा दरावर १७.५०% जादा होता, सदर निविदा ह्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०११-१२ च्या दरसुचीवर आधारीत आहेत. मा.महासभेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१२-१३ सालच्या दरसूची महानगरपालिके कडील कामांसाठी लागू करणेबाबत ठराव पारित केलेले आहेत. ठेकेदाराचा देकार वरीलप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालु (सन २०१२-१३) दूरसूचीनुसार तुलना करता, १०.१२% जादाचे होते.

प्राप्त दर जादाचे असल्याने मा.आयुक्तसो यांचे सूचनेनुसार दि.२१/०३/२०१३ रोजी वाटाघाटीने दर कमी करणेबाबत बैठक बोलावली होती. सदर बैठकीस मा.आयुक्त, उपायुक्त, मुख्य लेखापरिक्षक, कार्यकारी अभियंता व ठेकेदाराचे प्रतिनिधी हजर होते.

... २ ...

त्यावेळी ठेकेदारानी बाजारात सर्वच दर वाढले असल्याने देवू केलेले दर योग्य आहेत असे मत व्यक्त केले होते. तसेच त्यांनंतर दि.२२/०३/२०१३ रोजी पत्र देवून त्यात जादा दराची कारणे नमूद केली आहेत, ती खालीलप्रमाणे आहेत.

१) बाजारात खडी व वाळूचे दर वाढले आहेत.
२) मजुरीचेही दर वाढले आहेत.

तरी देखील त्यांनी पूर्वी देवू केलेले १७.५०% जादाचे दर ०.५% कमी करुन निविदा किंमतीवर १७% जादाने काम करणेची तयारी दर्शविली आहे. तसेच सदर निविदेमध्ये भाववाढ क्लॉज नाही व कामाची मुदत १ वर्षाची आहे. त्यांनी त्यांचे पूर्वीचे दर कमी करुन दिलेले १७% जादा चालु दरसूचीशी तुलना करता, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	रक्कम
१	निविदा किंमत (सन २०११-१२ च्या दरसूचीनुसार)	रु. ५,८०,६९,३४५/-
२	वाटाघाटीनंतरचा ठेकेदाराचे दर व किंमत	रु. १७% जादा रु. ६,७९,६४,५३३/-
३	सन २०१२-१३ चे दरसूचीनुसार किंमत	रु.६,१९,८०,७१२/-
४	सन २०१२-१३ चे दरसूचीनुसार ठेकेदाराचे सुधारीत देकार	रु.(६७९६४५३३-६१९८०७१२)/६१९८०७१२x१००=९.६५% जादा

या योजनेचे मिशन पिरियड मार्च २०१४ पर्यंत असून यामध्ये उपलब्ध अनुदान खर्च होणे अतिआवश्यक आहे. या कामाचे फेर टेंडर काढलेस, कालावधीदेखील जास्त लागू शकतो शिवाय दरवाढीमुळे फेरनिविदेमध्ये दर जास्तीचे येण्याची शक्यता प्राप्त परिस्थितीमध्ये अधिक वाटते.

तरी सदरची कामगिरी मे.ए.ई.इन्फ्राप्रोजेक्ट, ठाणे यांचेकडून शे. १७% जादा दराने करुन घेणेस व मुळ मंजुर योजना सन २००५-०६ सालच्या दरावर आधारीत असून प्रस्तावित कामाची मंजुर किंमत रु.३३५.४८ लक्ष आहे. ठेकेदाराच्या देकारानुसार होणारी किंमत रु.६७९.६४ लक्ष इतकी आहे. मंजुर किंमत व ठेकेदाराचा देकार यातील फरकामुळे रु.३४४.१६ लक्ष जादा खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनाकडून ही योजना पूर्ण करण्यासाठी सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार होणारी किंमत व मंजुर योजनेची किंमत यातील ५०% फरक अनुदान स्वरुपात व ५०% सॉफ्ट लोन स्वरुपात मिळणार आहे. योजना सुधारीत करुन अनुदान प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे. तरी सदर उपांगावर शासन अनुदानापेक्षा वरीलप्रमाणे होणा-या जादा खर्चास, ५०% सॉफ्टलोन घेणेसाठी व सदरच्या ठेकेदाराचे सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार होणाऱ्या किंतीच्या ९.६५% जादा दराचे निविदा दरास म्हणजेच रु.६,७९,६४,५३३/- इतक्या रक्कमेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड

अनुमोदक :- महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- ०५

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०२/०४/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेतले.

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी कार्यक्रमांतर्गत वाढीव व सुधारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेस माहे सप्टेंबर २००६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	मंजुर आकृतिबंध
१	केंद्रशासनचा हिस्सा ८०%	रु. ६३.२२ कोटी
२	राज्यशासनाचा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
३	मनपा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
	एकुण	रु. ७९.०२ कोटी

वरीलप्रमाणे मंजुर झालेल्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उशिराने अनुदान प्राप्त झाल्याने योजनापूर्ण करणेसाठी अपेक्षित खर्चामध्ये वाढ होणार हे लक्षात आलेनंतर महानगरपालिकेने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राधन्यक्रम ठरविणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती वर्ष निमित्त सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे प्रस्तावित करणेसाठी तांत्रिक सल्लागार नेमून दोन्ही योजनेंचा इंटिग्रेटेड स्टडी केला. युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजुर असलेल्या कामांचे व सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे पुनर्घटन करुन सादर करण्यात आलेल्या योजनेच्या सुधारीत प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे.

सुधारीत युआयडीएसएसएमटी अंतर्गत नव्याने सुचविलेली कामे वगळता इतर सर्व कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सदर निविदेमध्ये खालील नवीन कामाचा समावेश आहे.

१) सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेअंतर्गत महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी १५ लक्ष लि.क्षमतेचा जलकुंभ, संजयनगर, माळबंगला, आरटीओ उंच टाकी परिसर वितरण व्यवस्था इ.

वरील कामाची ई-निविदा नोटीस क्र. १२/५ सन २०१२-१३ नुसार निविदा मागविणेत आले होते. सदर ई-निविदा दिनांक २०/०२/२०१३ रोजी उघडणेत आले असून, मे. एस.व्ही. जाधव, मिरज यांचा देकार सर्वात कमीचा म्हणजेच निविदा दरावर १४.२१% जादा होता, सदर निविदा ह्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०११-१२ च्या दरसुचीवर आधारीत आहेत. मा.महासभेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१२-१३ सालच्या दरसूची महानगरपालिके कडील कामांसाठी लागू करणेबाबत ठराव पारित केलेले आहेत. ठेकेदाराचा देकार वरीलप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालु (सन २०१२-१३) दूरसूचीनुसार तुलना करता, ११.३६% जादाचे होते.

प्राप्त दर जादाचे असल्याने मा.आयुक्तसो यांचे सूचनेनुसार दि.२१/०३/२०१३ रोजी वाटाघाटीने दर कमी करणेबाबत बैठक बोलावली होती. सदर बैठकीस मा. आयुक्त, उपायुक्त, मुख्य लेखापरिक्षक, कार्यकारी अभियंता व ठेकेदाराचे प्रतिनिधी हजर होते.

त्यावेळी ठेकेदारानी बाजारात सर्वच दर वाढले असल्याने देवू केलेले दर योग्य आहेत असे मत व्यक्त केले होते. तसेच त्यांनंतर दि.२२/०३/२०१३ रोजी पत्र देवून त्यात जादा दराची कारणे नमूद केली आहेत, ती खालीलप्रमाणे आहेत.

१) डी.आय. पाईपचे दर ६ ते ७% ने वाढले आहेत. तसेच चालु डीएसआर मध्ये जोडाईचे दर कमी करणेत आले आहेत. प्रत्यक्षात मजुरी, डिझेल मशिनरीचे भाडे यामध्ये वाढ झालेली आहे.

२) वितरण व्यवस्थेचे पाईप लाईन टाकताना अस्तित्वातील केबल्स, ड्रेनेज लाईन व पाईपला मोडतोड होणार आहे व त्याची दुरुस्ती ठेकेदाराला करावी लागते.

३) वाळूचे लिलाव न झाल्यामुळे बाजारात वाळूचे भाव दुपटीने वाढले आहेत.

४) राफ्ट फाऊंडेशनसाठी डीएसआर मधील तरतुदीनुसार एकुण रकमेवर ७.५% (रु.७.५ लक्ष) वाढ दाखविली आहे. परंतु प्रत्यक्षात रु.२४.७० लक्ष वाढत आहेत.

निविदेमध्ये भाववाढ क्लॉज नाही. तरी आपल्या विनंती वरुन पूर्वीचा १४.२१% जादाचा दर कमी करुन १२.१५% जादाच्या दराने काम करणेस तयार असल्याचे कळविले आहे.

त्यांनी त्यांचे पूर्वीचे दर कमी करुन दिलेले १२.१५% जादा दर चालु दरसूचीशी तुलना करता तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	रक्कम
१	निविदा किंमत (सन २०११-१२च्या दरसूचीनुसार)	रु. ७,३९,४७,२७६/-
२	वाटाघाटीनंतरचा ठेकेदाराचे दर व किंमत	१२.१५% जादा रु. ८,२९,३१,८७०/-
३	सन २०१२-१३ चे दरसूचीनुसार किंमत	रु.७,५८,४२,५१६/-
४	सन २०१२-१३ चे दरसूचीनुसार ठेकेदाराचे सुधारीत देकार	रु.(८२९३१८७०-७५८४२५१६)/७५८४२५१६X१००=९.३४% जादा

या योजनेचे मिशन पिरियड मार्च २०१४ पर्यंत असून यामध्ये उपलब्ध अनुदान खर्च होणे अतिआवश्यक आहे. या कामाचे फेर टेंडर काढलेस, कालावधीदेखील जास्त लागू शकतो शिवाय दरवाढीमुळे फेरनिविदेमध्ये दर जास्तीचे येण्याची शक्यता प्राप्त परिस्थितीमध्ये अधिक वाटते.

ठेकेदाराचा देकार वरीलप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालु (सन २०१२-१३) दरसूचीनुसार तुलना करता, ९.३४% जादाचे आहेत.

तरी सदरची कामगिरी मे.एस.व्ही. जाधव मिरज यांचेकडून शे. १२.१५% जादा दराने करुन घेणेस व मुळ मंजुर योजना सन २००५-०६ सालच्या दरावर आधारीत असून प्रस्तावित कामाची मंजुर किंमत रु.४०६.५७ लक्ष आहे. ठेकेदाराच्या देकारानुसार होणारी किंमत रु.८२९.३१ लक्ष इतकी आहे. मंजुर किंमत व ठेकेदाराचा देकार यातील फरकामुळे रु.४२२.७४ लक्ष जादा खर्च अपेक्षित आहे.

मंजुर योजनेमध्ये प्रस्तावित जलकुंभ कर्नाळ रोड परिसरात बांधावयाचा होता. सदर १५ लक्ष लि. क्षमतेची उंच टाकी कर्नाळ रोडपरिसर पूरपट्टयात येत आहे व अजून डी.पी. प्लॅनही मंजुर झालेला नाही. जास्तीची मागणी आल्यास माळबंगला येथील प्रस्तावित २५ लक्ष लि. जलकुंभामधून आवश्यकतेप्रमाणे पाणी पुरवठा करता येईल. युआयडीएसएसएमटी योजना मार्च २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे बंधनकारक आहे. सुजल निर्मल अभियानांतर्गत टप्पा २ मध्ये समतानगर, बेथलहेमनगर या परिसरासाठी १५ लक्ष लि. क्षमतेचे जलकुंभाची तरतूद करणेत आली आहे. सदर परिसरास पाणी टंचाई असल्याने सदर जलकुंभ कर्नाळ रोड ऐवजी समतानगर व परिसर येथे बांधणेस मा.आयुक्तसाो यांनी शिफारस केली आहे. त्यास ही सभा मान्यता देत आहे.

महाराष्ट्र शासनाकडून ही योजना पूर्ण करण्यासाठी सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार होणारी किंमत व मंजुर योजनेची किंमत यातील ५०% फरक अनुदान स्वरुपात व ५०% सॉफ्ट लोन स्वरुपात मिळणार आहे. योजना सुधारीत करुन अनुदान प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे. तरी सदर उपांगावर शासन अनुदानापेक्षा वरीलप्रमाणे होणा-या जादा खर्चास, ५० % सॉफ्टलोन घेणेसाठी व सदरच्या ठेकेदाराचे सन २०१२-१३ च्या दरसुचीनुसार होणाऱ्या किंमतीच्या ९.३४% जादा निविदा दरास म्हणजेच रु.८,२९,३१,८७०/- इतक्या रक्कमेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

का.अ.(पा.५)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- ०६

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०२/०४/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेतले.

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी कार्यक्रमांतर्गत वाढीव व सुधारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेस माहे सप्टेंबर २००६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	मंजुर आकृतिबंध
१	केंद्रशासनचा हिस्सा ८०%	रु. ६३.२२ कोटी
२	राज्यशासनाचा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
३	मनपा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
	एकुण	रु. ७९.०२ कोटी

वरीलप्रमाण मंजुर झालेल्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उशिराने अनुदान प्राप्त झाल्याने योजनापूर्ण करणेसाठी अपेक्षित खर्चामध्ये वाढ होणार हे लक्षात आलेनंतर महानगरपालिकेने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राधान्यक्रम ठरविणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती वर्ष निमित्त सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे प्रस्तावित करणेसाठी तांत्रिक सल्लागार नेमून दोन्ही योजनेंचा इंटिग्रेटेड स्टडी केला. युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजुर असलेल्या कामांचे व सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे पुनर्घटन करुन सादर करण्यात आलेल्या योजनेच्या सुधारीत प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे.

सुधारीत युआयडीएसएसएमटी अंतर्गत नव्याने सुचविलेली कामे वगळता इतर सर्व कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सदर निविदेमध्ये खालील नवीन कामाचा समावेश आहे.

१) सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सांगलीवाडी येथे १५ लक्ष लि. क्षमतेचा जलकुंभ, शारावनगर येथे वितरण व्यवस्था व कंम्पाऊंड वॉल बांधणे.

वरील कामाची ई-निविदा नोटीस क्र. १२/१ सन २०१२-१३ नुसार निविदा मागविणेत आले होते. सदर ई-निविदा दि.२०/०२/२०१३ रोजी उघडणेत आले असून मे.विजय व्ही. साळूंखे, पुणे यांचा देकार सर्वात कमीचा म्हणजेच रु.५७४.०१ लक्ष एवढा होता. सदर दर निविदा दरावर १२.८८% जादा होता, सदर निविदा ह्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०११-१२ च्या दरसुचीवर आधारीत आहेत. मा.महासभेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१२-१३ सालच्या दरसूची महानगरपालिकेकडील कामांसाठी लागू करणेबाबत ठराव पारित केलेले आहेत. ठेकेदाराचा देकार वरीलप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालु (सन २०१२-१३) दूरसूचीनुसार तुलना करता, ७.०४% जादाचे होते.

प्राप्त दर जादाचे असल्याने मा.आयुक्तसाो यांचे सूचनेनुसार दि.२१/०३/२०१३ रोजी वाटाघाटीने दर कमी करणेबाबत बैठक बोलावली होती. सदर बैठकीस मा. आयुक्त, उपायुक्त, मुख्य लेखापरिक्षक, कार्यकारी अभियंता व ठेकेदाराचे प्रतिनिधी हजर होते.

... २ ...

त्यावेळी ठेकेदारानी बाजारात सर्वच दर वाढले असल्याने देवू केलेले दर योग्य आहेत असे मत व्यक्त केले होते. तसेच त्यांनंतर दिनांक २२/०३/२०१३ रोजी पत्र देवून त्यात जादा दराची कारणे नमूद केली आहेत, ती खालीलप्रमाणे आहेत.

१) सदर निविदेत भाववाढ क्लॉज नाही.
२) वाळूचे लिलाव झाले नसल्याने वाळूचे दर वाढले आहेत.
२) वितरण व्यवस्थेचे पाईप लाईनचे काम करतेवेळी इतर सर्व्हीसची केबल, पाईप लाईन, ड्रनेज इत्यादींचे मोडतोड होणार आहे. त्याची दुरुस्ती कंत्राटदारास करावी लागणार आहे.
३) सन २०१२-१३ सालच्या डीएसआर मधील दर वाढलेले नाहीत. प्रत्यक्षात मात्र वाढ झाली आहे. त्यामुळे कामास जादा खर्च अपेक्षित आहे.
४) राफ्ट फांऊंडेशनला एकुण ७.५% दर वाढ धरलेली आहे. प्रत्यक्षात २०% वाढ अपेक्षित आहे.

वरील कारणामुळे मे.विजय साळुंखे,पुणे यांनी पूर्वी देवू केलेले शे. १२.८८% जादाचे दर योग्य आहेत असे कळविले आहे. सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार ठेकेदाराचा दर ७.०४% जादाचे आहेत.

तरी सदरची कामगिरी मे. विजय साळुंखे, पुणे यांचेकडून शे. १२.८८% जादा दराने करुन घेणेस व मुळ मंजुर योजना सन २००५-०६ सालच्या दरावर आधारीत असून प्रस्तावित कामाची मंजुर किंमत रु.२६९.०२ लक्ष आहे ठेकेदाराच्या देकारानुसार होणारी किंमत रु.५७४.०१ लक्ष इतकी आहे. मंजुर किंमत व ठेकेदराचा देकार यातील फरकामुळे रु.३०४.९९ लक्ष जादा खर्च अपेक्षित आहे.

या योजनेचे मिशन पिरियड मार्च २०१४ पर्यंत असून यामध्ये उपलब्ध अनुदान खर्च होणे अतिआवश्यक आहे. या कामाचे फेर टेंडर काढलेस, कालावधीदेखील जास्त लागू शकतो शिवाय दरवाढीमुळे फेरनिविदेमध्ये दर जास्तीचे येण्याची शक्यता प्राप्त परिस्थितीमध्ये अधिक वाटते.

महाराष्ट्र शासनाकडून ही योजना पूर्ण करण्यासाठी सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार होणारी किंमत व मंजुर योजनेची किंमत यातील ५०% फरक अनुदान स्वरुपात व ५०% सॉफ्ट लोन स्वरुपात मिळणार आहे. योजना सुधारीत करुन अनुदान प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे. तरी सदर उपांगावर शासन अनुदानापेक्षा वरीलप्रमाणे होणा-या जादा खर्चास, ५० % सॉफ्टलोन घेणेसाठी व सदरच्या ठेकेदाराचे सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार होणाऱ्या किंमतीवर ७.०४% जादा दराचे निविदा दरास म्हणजेच रु.५,७४,००,५५२/- इतक्या रक्कमेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Salim A. Jamma

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

का.अ(पा.पु)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- ०७

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०२/०४/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेतले.

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी कर्यक्रमांतर्गत वाढीव व सुधारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेस माहे सप्टेंबर २००६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	मंजुर आकृतिबंध
१	केंद्रशासनचा हिस्सा ८०%	रु. ६३.२२ कोटी
२	राज्यशासनाचा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
३	मनपा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
	एकुण	रु. ७९.०२ कोटी

वरीलप्रमाण मंजुर झालेल्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उशिराने अनुदान प्राप्त झाल्याने योजनापूर्ण करणेसाठी अपेक्षित खर्चामध्ये वाढ होणार हे लक्षात आलेनंतर महानगरपालिकेने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राधन्यक्रम ठरविणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती वर्ष निमित्त सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे प्रस्तावित करणेसाठी तांत्रिक सल्लागार नेमून दोन्ही योजनेंचा इंटिग्रेटेड स्टडी केला. युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजुर असलेल्या कामांचे व सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे पुनर्घटन करुन सदर करण्यात आलेल्या योजनेच्या सुधारीत प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे.

सुधारीत युआयडीएसएसएमटी अंतर्गत नव्याने सुवचविलेले कामे वगळता इतर सर्व कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सदर निविदेमध्ये खालील नवीन कामाचा समावेश आहे.

१) सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड नळ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत कोल्हापूर रोड येथे १५ लक्ष लि.क्षमतेचा जलकुंभ, कोल्हापूर रोड येथे वितरण व्यवस्था व कंम्पाऊंडवॉल बांधणे.

वरील कामाची ई-निविदा नोटीस क्र. १२/२ सन २०१२-१३ नुसार रु. ५४१.५४ लक्ष किंमतीच्या निविदा मागविणेत आले हाते. सदर ई-निविदा दिनांक २०/०२/२०१३ रोजी उघडणेत आले असून मे.रचना इंजिनियर्स, कोल्हापूर यांचा देकार सर्वात कमीचा म्हणजेच रु. ६२२.५० लक्ष एवढा होता. सदर दर निविदा दरावर १४.९५% जादा होता, सदर निविदा ह्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०११-१२ च्या दरसुचीवर आधारीत आहेत. मा.महासभेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१२-१३ सालच्या दरसूची महानगरपालिकेकडील कामांसाठी लागू करणेबाबत ठराव पारित केलेले आहेत. ठकेदाराचा देकार वरीलप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालु (सन २०१२-१३) दूरसूचीनुसार तुलना करता, ८.९३% जादाचे होते.

... २ ...

प्राप्त दर जादाचे असल्याने मा. आयुक्तसाो यांचे सूचनेनुसार दिनांक २१/०३/२०१३ रोजी वाटाघाटीने दर कमी करणेबाबत बैठक बोलावली होती. सदर बैठकीस मा. आयुक्त, उपायुक्त, मुख्य लेखापरिक्षक, कार्यकारी अभियंता व ठेकेदाराचे प्रतिनिधी हजर होते.

त्यावेळी ठेकेदारानी बाजारात सर्वच दर वाढले असल्याने देवू केलेले दर योग्य आहेत असे मत व्यक्त केले होते. तसेच त्यांनर दिनांक २२/०३/२०१३ रोजी पत्र देवून त्यात जादा दराची कारणे नमूद केली आहेत, ती खालीलप्रमाणे आहेत.

१) सदरच्या ठिकाणी उंच टाकी बाधण्यासठी राुट फाऊंडेशनची आवश्यकता आहे. त्यासाठी डीएसआर मधील तरतुदीनुसार एकुा किंतीवर ७.५% वाढविणत आले आहे. त्यासाठी रु. २४.७१ लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे असे कळविले आहे.
२) डीआय पाईपच्या दर चालु दरसूचीपेक्षा ४.५% ते ६% वाढले आहेत.
३) वितरण व्यवस्थेसाठी पाईप टाकतेवेळी टेलिफोन केबल, पाण पुरवठयाची पाईप लाईन ड्रेनेज व्यवस्था यांची मोडतोड होईल व ती दुरुस्ती खर्च ठेकेदारांना करावा लागेल.
४) डिझेलचे दर वाढत आहेत.
५) वाळू उपशाला बंदी असल्याने बाजारात २ ते ३ पट दर वाढले आहेत.
६) भाववाढ क्लॉज नाही परंतु बाजारात भाववाढ होत आहे.

वरील कारणामुळे रचना इंजिनियर्स, कोल्हापूर यांनी पूर्वी देवू केलेले दर कमी करता येत नाही असे कळविले आहे. सन २०१२-१३ च्या चालु दरसूचीनुसार ठेकेदाराचा दर ८.९३% जादाचे आहे.

तरी सदरची कामगिरी मे.रचना इंजिनियर्स कोल्हापूर यांचेकडून शे. १४.९५% जादा दराने करुन घेणेस व मुळ मंजुर योजना सन २००५-०६ सालच्या दरावर आधारीत असून प्रस्तावित कामाची मंजुर किंमत रु.२८८.१९ लक्ष आहे ठेकेदाराच्या देकारानुसार होणारी किंमत रु.६२२.५० लक्ष इतकी आहे. मंजुर किंमत व ठेकेदराचा देकार यातील फरकामुळे रु.३३४.३१ लक्ष जादा खर्च अपेक्षित आहे.

या योजनेचे मिशन पिरियड मार्च २०१४ पर्यंत असून यामध्ये उपलब्ध अनुदान खर्च होणे अतिआवश्यक आहे. या कामाचे फेर टेंडर काढलेस, कालावधीदेखील जास्त लागू शकतो शिवाय दरवाढीमुळे फेरनिविदेमध्ये दर जास्तीचे येण्याची शक्यता प्राप्त परिस्थितीमध्ये अधिक वाटते.

महाराष्ट्र शासनाकडून ही योजना पूर्ण करण्यासाठी सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार होणारी किंमत व मंजुर योजनेची किंमत यातील ५०% फरक अनुदान स्वरुपात व ५०% सॉफ्ट लोन स्वरुपात मिळणार आहे. योजना सुधारीत करुन अनुदान प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे. तरी सदर उपांगावर शासन अनुदानापेक्षा वरीलप्रमाणे होणा-या जादा खर्चास, ५० % सॉफ्टलोन घेणेसाठी व सदरच्या ठेकेदाराचे सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार होणाऱ्या किंमतीच्या ८.९३% जादा दराचे निविदा दरास म्हणजेच रु.६,२२,५०२५८/- इतक्या रक्कमेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Sanjay A Sa...

का. अ (पा.पू)

अनुमोदक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- ०८

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०२/०४/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेतले.

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी कार्यक्रमांतर्गत वाढीव व सुधारीत सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेस माहे सप्टेंबर २००६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	मंजुर आकृतिबंध
१	केंद्रशासनाचा हिस्सा ८०%	रु. ६३.२२ कोटी
२	राज्यशासनाचा हिस्सा १०%	रु.७.९० कोटी
३	मनपा हिस्सा १०%	रु. ७.९० कोटी
	एकुण	रु. ७९.०२ कोटी

वरीलप्रमाणे मंजुर झालेल्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उशिराने अनुदान प्राप्त झाल्याने योजना पूर्ण करणेसाठी अपेक्षित खर्चामध्ये वाढ होणार हे लक्षात आलेनंतर महानगरपालिकेने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राधान्यक्रम ठरविणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती वर्ष निमित्त सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे प्रस्तावित करणेसाठी तांत्रिक सल्लागार नेमून दोन्ही योजनेंचा इंटिग्रेटेड स्टडी करुन याबाबत युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजुर असलेल्या कामांचे व सुजल निर्मल अभियानांतर्गत कामे पुनर्घटन करुन सादर करण्यात आलेल्या योजनेच्या सुधारीत प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे.

सुधारीत युआयडीएसएसएमटी अंतर्गत नव्याने सुचविलेले कामे वगळता इतर सर्व काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सदर योजनेमध्ये खालील नवीन कामांचे समावेश आहे.

१) माळंबगला येथील अस्तित्वातील ३६ दलिल क्षमतेच्या जलशुध्दीकरण क्षमता वाढविणे व केंद्राचे नुतनीकरण करणेसाठी रु. २०९.४५ लक्ष तरतुद आहे.

वरील कामाचे जाहिरात क्र.१० सन २०१२-१३ नुसार निविदा मागविणेत आले होते. सदर E-निविदा ६/१२/२०१२ रोजी उघडण्यात आली असून M/s Thermax Co.Pune यांचे देकार सर्वात कमी असून तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ क्र	कंत्राटदाराचे नांव	त्यांचे देकार
१	Thermax Co. Ltd	१९.५०% above
२	Aakar Infra	२८% above
३	Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd Kolhapur	३७% above

सर्वात कमी दर असलेला कंत्राटदार M/s Thermax Co Ltd यांचे दर देखील जादा असल्याने दर कमी करणेबाबत मा.आयुक्तसो यांचे दालनात दिनांक १५/०१/२०१३ रोजी बैठक घेऊन ठेकेदारांना त्यांचे दर कमी करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

... २ ...

त्यास अनुसरुन M/s Thermax Co Ltd यांनी त्यांचे पत्र क्र १५३ दिनांक ४/२/२०१३ ने पूर्वीचा १९.५% कमी करुन निविदा रकमेवर १२.५% जादा दराने कामे करण्यास तयारी दर्शविली आहे.

सध्या म.जी.प्रा.चे सन २०१२-१३ चे दरसूची लागु झाले असून या कामाचे तांत्रीक सल्लागार श्री.बी.एन.परीख यांचेकडून अंदाजपत्रक (सन २०१२-१३ दरानुसार) तयार करुन घेतले आहे. (श्री.बी.एन. परीख यांचे पत्र क्र nil दि.१८/२/२०१३) यानुसार ठेकेदाराचे दर (१२.५%) तुलना करता तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. मुळ निविदा किंमत (सन २०११-१२ च्या दरसुचीनुसार)	-	रु.२,२१,२८,४१८/-	(A)
२. ठेकेदाराचा मुळ देकार (१९.५% जादा)	-	रु. २,६४,४३,४५९/-	
३. ठेकेदाराचे देकार (वाटाघाटीनंतर कमी केलाला) (१२.५% जादा)	-	रु.२,४८,९४,४७०/-	(B)
४. सन २०१२-१३ च्या दरसुचीनुसार होणारी किंमत	-	रु.२,४२,६३,९३०/-	(C)
५. चालु दरसुचीशी तुलनात्मक ठेकेदाराचे देकार (%) (B- C/B)x१००	-	२.५९% (जादा)	

तरी सदरची कामगिरी थर्मेक्स कंपनी लि. यांचेकडून शे. १२.५०% जादा दराने करुन घेणेस व मुळ मंजुर योजना २००५-०६ सालच्या दरावर आधारीत असून मंजुर किंमत रु.२०९.४५ लक्ष इतकी आहे. या उपांगावर मजुर किंमत रु.२०९.४५ लक्ष ठेकेदाराचे देकारानुसार होणारी किंमत रु.२४८.९४ लक्ष यातील फरक रु. ३१.४९ लक्ष जादा खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनाकडून ही योजना पूर्ण करण्यासाठी सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार होणारी किंमत व मंजूर योजनेचे किंमत यातील ५०% फरक अनुदान स्वरुपात व ५०% सॉफ्ट लोन स्वरुपात मिळणार आहे. योजना सुधारीत करुन अनुदान प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे. तरी सदर उपांगावर शासन अनुदानापेक्षा वरीलप्रमाणे होणा-या जादा खर्चास, ५०% सॉफ्टलोन घेणेसाठी व सदरच्या ठेकेदाराचे सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार होणाऱ्या किंमतीच्या २.५९% जादा निविदा दरास म्हणजेच रु.२,४८,९४,४७०/- इतक्या रक्कमेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Salim A. Inam

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

का.अ(पा.पु)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- ०९

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे सहा.संचालक नगररचना विभाग यांचे दि.०२/०३/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली येथील रि.स.नं. २६६ पै. नगरभूमापन क्रं. १८०७ या मिळकती वरील सांगली शहराच्या सुधारित मंजूर विकास योजने मधील आ.क्रं. १२६ धर्मशाळा व स्टाफ क्वाटर्स या वापरासाठी आरक्षित जागे संदर्भात संदर्भ (१) अन्वये म. प्रा. व न. र. अधि. १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी करणेसाठी सूचना महानगरपालिकेस बजावलेली आहे.

सांगली शहराची सुधारित विकास योजना शासनाने सन १९७७ मध्ये मंजूर केली आहे. सदर सुधारित मंजूर विकास योजनेमध्ये सांगली येथील रि.स.नं. २६६ (सि.स.नं. १८०७, ११४२) या मिळकती ६४०० चौ.मी. क्षेत्र म्युनिसिपल धर्मशाळा ॲण्ड स्टाफ क्वार्टस या वापरासाठी आरक्षण प्रस्ताव आहे.

महानगरपालिकेने तिच्या संपूर्ण क्षेत्रासाठी म. प्रा. व. न. र. अधि. १९६६ मधील तरतूदीनुसार प्रारुप विकास योजना तयार करुन उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये दि. ४/३/२००५ रोजी प्रसिध्द केलेली होती. सदर कलम २६(१) अन्वये प्रसिध्द प्रारुप विकास योजनेमध्ये सांगली येथील सि.स.नं.१८०७ व ११४२ या मिळकती आ.क्रं.८६ अन्वये म्युनिसिपल धर्मशाळा व स्टाफ क्वार्टस या वापरासाठी ६४०० चौ.मी. क्षेत्रात सुधारित मंजूर विकास योजनेप्रमाणे आरक्षण प्रस्ताव करणेत आला.

महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना / उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) अन्वये शासनाने दि.४/४/२०१२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे भागश: मंजूर केली असून भागश: पुर्नप्रसिध्द केली आहे. सदर अधिसूचने सोबतच्या परिशिष्ट अ मधील एसएमपी-२६, पीसीएफ-१ नुसार आ.क्रं. ८६ हा आरक्षण प्रस्ताव कायम ठेवून सदर आरक्षणाजवळ म.न.पा.ची फायर ब्रिगेड साठीच्या वापरातील जागा असलेने आरक्षणाचे नांव फायरब्रिगेडच्या वाढीसाठी आणि स्टाफ क्वार्टर या वापरासाठी असे करणेत आले आहे. आरक्षणाचे समुचित प्राधिकरण सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आहे. सदर विकास योजना दि.२०/४/२०१२ पासून अंमलात आली आहे.

श्री.उदय बाळकृष्ण देशपांडे व इतर यांनी सि.स.नं.१८०७ क्षेत्र ३३५८.८० चौ.मी. खरेदी करणेबाबत संदर्भ क्रं.१ अन्वये महानगरपालिकेस खरेदी सूचना बजावलेली आहे.

वरिलप्रमाणे उक्त जागेतील आरक्षणाबाबत वस्तुस्थिती पाहता सदर जागा सांगली शहराच्या सुधारित मंजूर विकास योजना आणि महानगरपालिकेच्या कलम ३१(१) अन्वये भागश: मंजूर विकास योजनेमध्ये आरक्षण प्रस्ताव कायम आहे. ही वस्तुस्थिती पाहता तसेच म. प्रा. व न. र. अधि. १९६६ चे कलम १२७ मधील तरतूदी अवलोकनी घेता उक्त जागेतील आरक्षण अधिनियमातील तरतूदीनुसार एक वर्षाच्या कालावधीत संपादनाची कार्यवाही न केलेस उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार आरक्षण व्यपगत होणेची शक्यता नाकारता येत नाही.

... २ ...

त्या अनुषंगाने मे. उच्च न्यायालयातील महापालिकेतील वकील एन.व्ही.वालावलकर यांचे दि.२६/२/२०१३ च्या पत्रान्वये कायदेशीर अभिप्राय घेतले असता त्यांनी दि. २२/३/२०१३ च्या पत्रान्वये खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री.देशपांडे यांनी दिलेल्या दि.९/८/२०१० रोजी दिलेल्या कलम १२७ च्या नोटीशीच्या अनुषंगाने महापालिकेने त्यांना दि.२३/२/२०११ रोजी पत्र देऊन काहीं आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन देणेस सांगीतले होते. ती कागदपत्रे पाहून कलम ४६ प्रमाणे विकास परवानगी देता येत नाही. असे अर्जदार यांना कळविले होते. त्यावर दि. १३/७/२०१२ रोजी श्री. देशपांडे यांनी मा. महापौर यांना दिलेले पत्र ही कलम १२७ अन्वये दिले जाणारी नोटीस होऊ शकत नाही. अर्थात त्या अनुषंगाने योग्य वाटणारी कार्यवाही महानगरपालिका करु शकते. परंतू कलम १२७ खालची नोटीस असे त्याचे स्वरुप नाही. त्यांनी जमीनीवरील आरक्षण रद्द करण्याची विनंती केली आहे. ती इतर कायदेशीर तरतूदींची पूर्तता केल्याशिवाय मान्य करता येणार नाही. यातील दि.९/८/२०१० रोजीची नोटीस कलम १२७ खालील आहे. त्यावर महापालिकेने जे उत्तर दिले आहे ते मान्य नसल्यास अर्जदार यांनी कोर्टात दाद मागितली असती तर निराळ्या दृष्टीने त्याचा विचार करावा लागला असता परंतू, आहे त्या परिस्थीतीत दि. ६/८/२०१० रोजीच्या नोटीशीनंतर महापालिकेने भूसंपादनाची कार्यवाही केलेली नाही. तरी श्री. देशपांडे हे कोर्टात जाऊन दाद मागेपर्यंत सद्यस्थिती आहे तीच सुरु राहील असे अभिप्राय दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने उक्त जागा संपादनाबाबत मा. जिल्हाधिकारी, सांगली यांना भूसंपादन प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सदर खरेदी सूचनेतील जमिन संपादनासाठी आर्थिक तरतूद करणे अपेक्षित असलेने सदर जागेच्या संपादनासाठी खालील प्रमाणे मूल्यांकन निश्चित करणेत येत आहे.

सांगली सि.स.नं. १८०७ या जागेचे नगरभूमापनकडील मालमत्ता पत्रिकेनुसार क्षेत्र ३३५८.८० चौ.मी. आहे. सदर जागा सन २०१२ च्या बाजारमूल्य दरतक्त्याप्रमाणे मूल्यदर विभाग ५/४३ अंतर्गत टिंबर मार्केट व उत्तर शिवाजी नगरचा पूर्व भाग यामध्ये समाविष्ट आहे. सदर मूल्यदर विभागातील खुल्या जमिनीचा प्रती चौ.मी. दर रुपये ३,८२०/- इतका आहे. बाजारमूल्य दर तक्त्यातील मार्गदर्शकतत्वानुसार सदर खरेदी सूचनेतील सि.स.नं. १८०७ या जागेचे सन २०१२ मधील मूल्य खालीलप्रमाणे होईल.

५०० चौ.मी. x रु. ३,८२०/- प्रती चौ.मी.	= रु.	१९,१०,०००/-
१५०० चौ.मी. x रु. ३,८२०/- प्रती चौ.मी. x ०.९०	= रु.	५१,५७,०००/-
१३५८.८० चौ.मी. x रु. ३,८२०/- प्रती चौ.मी. x ०.८०	= रु.	४१,५२,४९२/-
		रु. १,१२,१९,४९२/- (१)

सदरचे मूल्य सन २०१२ च्या बाजारमूल्य दरतक्त्यानुसार आहे. सदर जागा भूमिसंपादन अधिनियमातील तरतूदीनुसार संपादन करावी लागणार असलेने सदर मूल्यावर खालीलप्रमाणे अतिरिक्त घटकासाठी आकारणी होणार आहे.

(१) जमिन मूल्याचा ३० टक्के प्रमाणे दिलासा रक्कम रुपये

रु. १,१२,१९,४९२/- x ०.३०= रु. ३३,६५,८४८/-

(२) अधिसूचना प्रसिध्दी तारखेनंतर निवाडा जाहीर होणेच्या कालावधीसाठी प्रतीवर्षी १२ टक्के प्रमाणे व्याज रक्कम सदरचा कालावधी अधिनियमातील तरतुदीनुसार कमाल २ वर्षाचा असलेने)

२४ टक्के व्याज रक्कम = १,१२,१९,४९२/- x २४/१०० = रु. २६,९२,६७८/-

(३) ३ टक्के प्रमाणे आस्थापना खर्च = रु. १,१२,१९,४९२/- x ०.०३= रु. ३,३६,५८५/-

---

रु.६३,९५,१११/- (२)

एकूण खर्च = (१) +(२)
= रु. १,१२,१९,४९२/- + रु. ६३,९५,१११/-
= रु. १,७६,१४,६०३/-

सदर आरक्षित जागा भूसंपादन अधिनियमातील तरतुदीनुसार संपादन करणेची असलेने भूसंपादन प्रस्तावासोबत वरिल जमिन मूल्याच्या २/३ रक्कम रु. १,१२,१९,४९२/- x २/३= रु. ७४,७९,६६१/- मा. जिल्हाधिकारी, सांगली यांना पाठविणे आवश्यक आहे.

उपरोक्त आरक्षणाखालील जागा भूमि संपादन अधिनियमातील तरतूदीनसार संपादन करणेची झाल्यास सदर भूमिसंपादन प्रस्ताव व वरील प्रमाणे होणाऱ्या रु. १,७६,१४,६०३/- खर्चासाठी व भूसंपादना सोबत मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे पाठविणेच्या र.रु.७४,७९,६६१/- या रक्कमेबाबत सभागृहामध्ये सविस्तर चर्चा करणेत आली.

महाराष्ट्र शासनाने सर्व महापालिकात एलबीटी लागू करणेचा निर्णय घेतलेला आहे. महापालिकेत ०१ जून पासून एल बी टी लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील दोन ते तीन वर्ष मनपास उत्पन्नाला फार मोठा फटका बसणार आहे. तसेच सदर जागे लगतच फायर ब्रिगेडसाठी जागा पुरेशी उपलब्ध आहे. त्यामुळे चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

उक्त रि.स.नं.२६६ मधील मिळकती मधील म्युनिसिपल धर्मशाळा व स्टाफ क्वॉर्टर्स आरक्षणाखालील जागा भूमी संपादन रक्कम रुपये १,७६,१४,६०३/- पैकी २/३ र.रु.७४,७९,६६१/- प्रस्तावासोबत भरणेचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव बहुमताने मंजुर

महापौर,

स.सं.त्र.१

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :-(विस) ०१ दिनांक :- ०६/०४/२०१३

ठराव क्रमांक :- १०

विषय क्रमांक :- १०

सोबतचे सहा.संचालक नगररचना यांचे दि.०२/०४/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली येथील रि.स.नं. ३३१/अ/२/१ या मिळकतीचे मिळकतधारक श्रीमती उषा प्रभाकर सहस्त्रबुध्दे व इतर यांनी सांगली शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील आणि म.न.पा.च्या भागश: मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीतील दवाखाना व प्राथमिक शाळा व क्रिडांगण या वापरासाठी आरक्षित जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी करणेसाठी सूचना दिलेली आहे.

सांगली शहराची मंजूर सुधारित विकास योजना शासनाने सन १९७७ मध्ये मंजूर केली आहे. सदर मंजूर विकास योजनेनुसार सांगली स.नं.३३१/अ/२ या जागेमध्ये उत्तर बाजूस ५० फूट (१५.२५मी.) रुंद नियोजित रस्ता, पूर्व-पश्चिम रस्ता प्रस्ताव आणि खालीलप्रमाणे आरक्षण प्रस्ताव आहेत.

अ.नं.	आ. क्रं.	आरक्षणाचे नांव	क्षेत्र	समुचित प्राधिकरण
१	१०१	प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान	४३७५.००	महानगरपालिका
२	१०२	पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ ऑफिस	१११५.००	पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ विभाग
३	१०३	दवाखाना	१२००.००	महानगरपालिका.

महानगरपालिका अस्तित्वात आलेनंतर म.न.पा. संपूर्ण क्षेत्रासाठी म. प्रा. व न. र. अधि. १९६६ मधील तरतूदीनुसार प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमातील कलम २६(१) अन्वये प्रसिध्द आणि कलम ३०(१) अन्वये शासन मंजूरीसाठी सादर प्रारुप विकास योजनेमध्ये सदर जागेतील उपरोक्त आरक्षण प्रस्ताव कायम ठेवणेत आलेली आहेत. उक्त प्रारुप विकास योजना शासनाने दि.४/४/२०१२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे भागश: मंजूर केली असून प्रसिध्द केली आहे. सदर अधिसूचनेमध्ये उपरोक्त आरक्षणाबाबत कोणताही उल्लेख नसलेने सदर आरक्षण प्रस्ताव, आरक्षण क्षेत्र आणि समुचित प्राधिकरण कायम आहेत.

संदर्भित पत्रान्वये दिलेली खरेदी सूचना फक्त दवाखाना आणि प्राथमिक शाळा व क्रिडांगण या महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असलेल्या आरक्षणासाठीच आहे.

सांगली स.नं. ३३१/अ/२/१ या जागेचे एकूण क्षेत्र १ हे. ८१ आर. शेतजमिन आणि ६ आर. पोटखराब या प्रमाणे १ हे. ८७ आर. इतके आहे.

... २ ...

खरेदी सूचनेतील आरक्षित जागेखालील क्षेत्र दामोदर रामचंद्र बापट क्रिडा प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट यांनी नागरी जमिन कमाल धारणा कायद्याअंतर्गत कलम २० खाली सूट घेतलेल्या १४५४७ चौ.मी. क्षेत्रा पैकी व आताच्या ७/१२ उताऱ्यानुसार १४ मिळकतधारकांच्या मालकीची आहे. केंद्र शासनाने सदर नागरी जमिन कमाल धारणा कायदा रद्द केला आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये मे. उच्च न्यायालयातील पॅनल वरील वकील ॲड. श्री. वालावलकर यांचे दि. २६/२/२०१३ च्या पत्रान्वये कायदेशीर अभिप्राय घेतले असता त्यांनी दिनांक २२/३/२०१३ च्या पत्रान्वये खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

श्रीमती सहस्रबुध्दे यांच्या नोटीसी संदर्भात दि. १४/६/२०१२ च्या नोटीशी नंतर कलम १२७ मधील अद्यायावत दुरुस्तीनुसार आता दि. ३१/६/२०१३ पर्यंत महानगरपालिकेने मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे भूसंपादनाचा प्रस्ताव दाखल करुन भूसंपादनाचे कलम १२६ (१) ते (४) व भूमीसंपादन कायदा कलम ६ प्रमाणे नोटीफिकेशन करुन घेण्याची कार्यवाही करणे शक्य आहे. तशी पावले उचलल्यास सदर जागेचे भूसंपादन करणे शक्य आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ मधील तरतूदीनुसार आरक्षणाने बाधीत जमिन मालक / मिळकतधारक अथवा हितसंबंधीत खरेदी सूचना देऊ शकत असलेने आणि उक्त खरेदी सूचना ७/१२ उताऱ्यानुसारच्या जमीन मालकाने दिलेली असलेने सदर खरेदी सूचनेनुसार अधिनियमातील तरतूदीनुसार खरेदी सूचना प्राप्त झालेबाबत एक वर्षाच्या कालावधीत भूसंपादनाची कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अन्यथा खरेदी सूचनेतील नमूद आरक्षणे व्यपगत होणेची शक्यता नाकारता येत नाही. त्याअनुषंगाने भूमिसंपादन प्रस्ताव त्वरीत मा.जिल्हाधिकारी, सांगली यांना सादर करणे अपेक्षित असलेने व भूमिसंपादन प्रस्तावासाठी व होणाऱ्या खर्चासाठी मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर जागेच्या भूसंपादनासाठी अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे मूल्यांकन करुन निश्चित करणेत येत आहे. संपादना खालील क्षेत्र विकास योजनेनुसार दवाखाना क्षेत्र १२००.०० चौ.मी.आणि प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ४३७५.०० चौ.मी. असे एकूण क्षेत्र ५५७५.०० चौ.मी. इतके आहे.

सन २०१२ च्या बाजारमूल्य दरतक्त्यानुसार सांगली सि.स.नं.३३१ ही जागा मूल्य दर विभाग ७/५२ अंतर्गत गुलमोहोर कॉलनी, रेव्हेन्यू कॉलनी, गणेश नगर व परिसर या मूल्य दर विभागात समाविष्ठ असून सदर मूल्य दर विभागातील खुल्या जमीनीचा प्रती चौ.मी. दर रु. ५०७०/- इतका आहे. बाजारमूल्य दरतक्त्यातील मार्गदर्शक तत्वानुसार सदर जमिनीचे मूल्य खालीलप्रमाणे होईल.

५०० चौ.मी. x रु. ५०७०/- प्रती चौ.मी.	=	रु. २५,३५,०००/-
१५०० चौ.मी. x रु.५०७०/- प्रती चौ.मी. x ०.९०	=	रु. ६८,४४,५००/-
२००० चौ.मी. x रु. ५०७०/- प्रती चौ.मी. x ०.८०	=	रु. ८१,१२,०००/-
१५७५ चौ.मी. x रु. ५०७०/- प्रती चौ.मी. x ०.६०	=	रु. ४७,९१,१५०/-
		----------
	=	रु.२,२२,८२,६५०/-

(रु. दोन कोटी बावीस लक्ष ब्याऐंशी हजार सहाशे पन्नास मात्र)

उक्त प्रकरणी भूसंपादन प्रस्तावाद्वारे संपादन करावी लागणार असलेने भूमिसंपादन अधिनियमातील तरतुदीनुसार अतिरिक्त घटकासाठीची खालीलप्रमाणे रक्कम अदा करणे अपेक्षित आहे.

(१) जमिनीच्या किंमतीवर ३० टक्के दिलासा रक्कम = रु. २,२२,८२,६५०/-x ३०%
= रु. ६६,८४,७९५/-

(२) भूसंपादन अधिसूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून निवाडा जाहीर करणेच्या दिनांकापर्यंत १२% प्रमाणे जमिन किंमती दर व्याज (सदर कालावधी अधिनियमातील तरतुदीनुसार २ वर्षे विचारात घेता.) = रु. २,२२,८२,६५०/- x १२% x २ = रु. ५३,४७,८३६/-

(३) आस्थापना खर्च रु. २,२२,८२,६५०/-x ०.०३ = रु. ६,६८,४८०/-

एकूण रु. १,२७,०१,१११/- ...(२)

वरील जमिनीची किंमत आणि अधिनियमानुसारचा इतर खर्च एकत्रितपणे एकूण खर्च (१) + (२)

= रु. २,२२,८२,६५०/- + रु. १,२७,०१,१११/-

= रु. ३,४९,८३,७६१/-

वरील जागेचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, सांगली यांना सादर करतांना उपरोक्त जमिन किंमतीच्या २/३ रक्कम जमा करणे अपेक्षित आहे.

= रु. २,२२,८२,६५०/- x २/३

= रु.१,४८,५५,१००/- होते.

वरिलप्रमाणे दवाखाना आणि प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान आरक्षणा खालील जागा भूमिसंपादन अधिनियमातील तरतूदीनसार संपादन करणेची झालेस भूमिसंपादन प्रस्ताव आणि वरीलप्रमाणे रक्कम रुपये ३,४९,८३,७६१/- रक्कमेसाठीच्या खर्चास व भूमिसंपादन प्रस्तावासोबत मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविणेची २/३ रक्कम रुपये १,४८,५५,१००/- या रकमेबाबत सभागृहामध्ये सविस्तर चर्चा करणेत आली.

महाराष्ट्र शासनाने सर्व महापालिकात एलबीटी लागू करणेचा निर्णय घेतलेला आहे. महापालिकेत ०१ जून पासून एल बी टी लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील दोन ते तीन वर्ष मनपास उत्पन्नाला फार मोठा फटका बसणार आहे. तसेच, सदर जागे लगतच १००मीटरचे परिसरात दामाणे हायस्कूल,सांगली व मालू हायस्कूल सांगली व मनपा शाळा क्र.३४ या शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. तसेच, ५०० मीटर अंतरावर मंजूर डेव्हल्पमेंट प्लॅन मध्ये १६ एकर जागेमध्ये स्पोर्टस सेंटर करीता प्रस्ताव मंजूर झालेला आहे. त्यामुळे आरक्षित क्र.१०१ व १०३ ची आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

उक्त रि.स.नं.३३१/अ/२/१ मधील मिळकती मधील वरील दवाखाना, प्राथमिक शाळा, खेळाचे मैदान आरक्षणाखालील जागा भूमी संपादन रक्कम रुपये ३,४९,८३,७६१/- पैकी २/३ र.रु.१,४८,५५,१००/- प्रस्तावासोबत भरणेचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव बहुमताने मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,